# प्रशांती संदेश

## भाग ७८

प्रशांती संदेशच्या ७८व्या भागात तुमचे स्वागत असो. प्रशांती संदेश ह्या पॉडकॉस्टमध्ये व्यक्त झालेला तुमचा दृष्टिकोन आणि भावना ह्यांनी आम्ही अत्यंत प्रोत्साहित झालो आहोत. आगामी काळातही तुम्ही अशीच रूची दाखवावी ही विनंती. खूप खूप धन्यवाद.

आजचा विषय आहे– 'हे अहंकारा, तू निघून जा.' मी पुनरुच्चार करतो, 'हे अहंकारा, तू निघून जा.' मला आपल्यासमोर 'अहंकार' या विषयावर काही विचार मांडू द्यात.

अहंकार नष्ट झाल्याशिवाय आपल्याला सत्य काय ते कळणार नाही. जोपर्यंत आपण अहंकारी आहोत, तोपर्यंत समाज आपल्याला स्वीकारणार नाही. अहंकारामुळे आपण स्वत:ला समाजापासून दूर ठेवतो. अहंकारामुळे तुम्ही एकाकी पडाल. म्हणून या विषयावर विशाल दृष्टिकानातून आपण बोलूया.

आपल्या डोक्यात हा अहंकार का व कसा निर्माण होतो? या अहंकाराचे मूळ कारण काय असते? ते अगदी सोपे आहे. जोपर्यंत मी स्वत:ला 'मीच कर्ता आहे' असं समजतो, 'मीच कर्ता आहे, कर्तृत्ववान आहे असे समजतो' हाच अहंकाराचा पाया असतो, तेच अहंकाराचे मूळ कारण असते आणि हा अहंकार हा विषारी सापाप्रमाणे असतो आणि हाच अहम् आपल्याला अतिशय तीव्र जखम करतो. हा अहम् जसा जसा वाढत जातो, तसतसा अहम्, कर्तृत्वाची भावना वाढत जाते. कर्तेपणाची भावना वाढत जाते. म्हणजेच जोपर्यंत 'मी हे करतो' अशी भावना असते, तेव्हा तुम्ही अहंकारी असता. जोपर्यंत तुम्हाला वाटत असतं की मी एकटाच हे करू शकतो, तोपर्यंत अहम् शिखरापर्यंत पोचलेला असतो. 'ओह्! ओहो! त्या वेळेला तुमच्यातला अहम् शिखरावर पोचलेला असतो.

तुम्ही एक मोठे घर बांधता. घर जितके मोठे तितका तुमचा अहंकार मोठा. अहम् आणि तुमचे घर– थेट एकमेकांच्या प्रमाणातच असतात. म्हणूनच काही माणसं त्यांच्या घराबद्दल मोठ्या बढाया मारत असतात. तुम्हाला माहीत आहे, हे घर पन्नासात बांधलं गेलं, तुम्हाला माहीत आहे सगळं संगमरवर राजस्थानातून आणलं आहे. कुणी विचारलं होतं? कुणाला हवं होतं? ते केवळ अहम्मुळेच होतं. अहम्चे प्रदर्शन असतं.

आणि आता काही लोकांना जग जिंकायचं आहे. तुम्ही कधी जग जिंकू शकाल का? जग हे काय एखाद्याच्या हातात असतं का? ते जिंकायला कोणाच्या हातात आहे का? आणि जरी ते तुम्ही जिंकलंत तरी ते तुमच्याबरोबर राहणार आहे का? काहीही नाही पण हे अहम्चेच प्रदर्शन आहे.

उदाहरणार्थ– एखादा मंत्री किंवा कुणी मुख्यमंत्री अथवा खूप वरचा मोठा अधिकारी– जिल्हा पातळीवरचा किंवा राज्य पातळीवरचा– कोणीही असो, ते फार कडक किंवा संकुचित वृत्तीचे असतात. ते लोकांशी काही संबंध ठेवत नाहीत, ते जनमानसात मिसळत नाहीत. जोपर्यंत ते त्या एखाद्या विशिष्ट स्थानावर असतात, तोपर्यंत ते जनमाणसांशी संबंध ठेवत नाहीत, हे सर्व अहम् भावापोटीच असत. ठीक आहे. ह्या 'अहम्'च्या पातळ्या वेगवेगळ्या असू शकतील. सगळा लहान मोठ्या प्रमाणात हा अहम्ही असतो. उदाहरणार्थ, कॉलेजातील प्राध्यापकांना वाटत असतं की तो वर्गाचा अधिपती आहे. कचेरीतील मोठ्या व्यवस्थापकाला वाटतं की तो त्याच्या कचेरीचा महाराजा आहे, इतकंच कशाला? कचेरीतील मदतनीस किंवा हाताखालच्या लोकांनादेखील वाटतं की तेच अधिकारी आहेत. असं का? तर ते कुणालाही साहेबाची भेट घेण्यासाठी वाट पाहायला लावू शकतात.

म्हणून 'अहम्' हा प्रत्येक पातळीवर, प्रत्येक पायरीवर असतो. आणि काय घडतं? जेव्हा 'अहम्' काही कारणांनी हळूहळू कमी होत जातो, तेव्हा अहंकार बाळगणं किती निरर्थक असतं हे लक्षात येतं, कळतं. हा अहम् बाळगण्याचा आपल्या वैयक्तिक जीवनाशी काहीही संबंध नसतो आणि परत जर तुम्ही निरीक्षण कराल,

तर तुमच्या लक्षात येईल की आपण जे करत असतो त्याच्या मर्यादेपर्यंतच हा अहम् असतो. जर तुम्हाला वाटत असेल की माझ्या कुटुंबात मी फार मोठा, शहाणा आहे, तर होय! तुम्ही कौटुंबिक मर्यादेपर्यंत अहंभावी आहात. मला असं वाटतं की मी कायदेमंडळाचा सदस्य किंवा महापौर आहे म्हणून समाजात मी फार मोठा आहे, तर होय, तुम्ही त्या पातळीपर्यंत अहंकारी आहात. म्हणजेच तुमच्या कार्यक्षेत्रामध्ये तुम्हाला अहंभाव असणं हे स्वाभाविक आहे.

आणि आपल्याला ह्या अहंकारी, अहंभावी लोकांची दुसरी एक गोष्टही माहीत असली पाहिजे. कोणताही अहंभावी माणूस कुठल्याही गोष्टीला एकदम 'होय' म्हणण्यास तयार नसतो.

तुम्ही जर त्याला विचाराल की सर, आपण हे करू या का? नाही! सर, मी बरोबर आहे ना? नाही! तो म्हणतो. असं 'नाही' म्हणण्यामध्ये अहंकारी माणसाला 'आपण फार शक्तीशाली आहोत, आपल्या हातात खूप अधिकार आहेत' असं वाटत असतं. असं नकारार्थी उत्तर देण्यातच त्याची ताकद सामावलेली असते आणि जर एखाद्या अहंकारी माणसाने 'होय' असं उत्तर उिदलं तर त्याला तो हतबल झाल्यासारखं वाटतं. दुसरी खूण म्हणजे हा अहंकारी माणूस 'नकारात्मक'च असतो. तो कशालाही एकदम 'हो' म्हणणार नाही. का?

माझ्या आजीकडून मी एक गोष्ट ऐकली होती. एक भिक्षेकरी भिक्षा मागायला आला. घरातली सून बाहेर आली आणि म्हणाली, ''ओह! आता आम्ही मोकळे नाही. कामात आहोत. कृपा करून जा.'' भिक्षेकरी निघाला. तेवढ्यात सासू मंदिरातून आली आणि त्याच्या घरातून बाहेर पडणाऱ्या भिक्षेकऱ्याला तिने पाहिले आणि तिने विचारलं, ''तू का जात आहेस?'' ''तिने मला जायला सांगितलं.'' ''नाही. तू आत ये.'' आणि असे म्हणून सासू आत गेली व मग म्हणाली, ''आता तू जा.'' याचा अर्थ असा होतो की, सासूला वाटतं की नाही म्हणण्याचा अधिकार सुनेला नाही. तो अधिकार फक्त मलाच आहे. असे सासूला वाटत होते.

म्हणून 'नाही' म्हणण्याची प्रवृत्ती लोकांना फार ताकदीची किंवा सामर्थ्याची वाटत असते. पण ती चुकीची आहे. अशा तऱ्हेची 'नाही' म्हणण्याची प्रवृत्ती कुटुंबातही असते. 'होय' किंवा 'नाही' असे फक्त आई किंवा वडिलांनीच सांगावं. मुलं असं म्हणू शकत नाहीत. कारण ही गोष्ट कौटुंबिक क्षेत्रातील असते.

आणि आपल्याला हे समजतं की ही अहंकारी माणसं नास्तिक किंवा अविश्वास बाळगणारी असतात कारण त्यांच्यासाठी त्यांच्यावर कोणी परमेश्वर नसतो. तेच स्वत: अंतिम निर्णय घेणारी असतात. होय, माझ्यापेक्षा वर कोणीही नाही अशी त्यांची भावना असते. आणि ह्या भावनेमुळे त्यांना आनंद मिळतो. बघा, केवढी आणि किती गंमतीची गोष्ट आहे.

सरतेशेवटी हा अहंकारच आपल्या जन्म-मरणाला कारण असतो. खरं म्हणजे मृत्यू पावतो तो अहंकार! व्यक्ती, आत्मा किंवा जाणीव मरत नाही. जो मरण पावतो तो अहंकार असतो. आणि मृत्यू पावणाऱ्या अहंकाराला आपण अनुसरत असतो. किती दयनीय अवस्था आहे ही!

आणि जोपर्यंत आपण अहंकारी असतो, तोपर्यंत आपली हार नक्कीच होते. तुम्ही हरणार आहात हे नक्की असतं कारण तुम्ही अहंकारी असल्यामुळे, तुम्ही एकटेच राहता. कोणालाही तुमच्याबरोबर बोलायला आवडत नाही. आणि तुम्ही कुणातच मिसळू शकत नाही. अवतीभवती पसरलेल्या विस्तीर्ण जगाशी तुमचे नाते राहत नाही. म्हणून तुमच्या एकटेपणामध्ये तुम्ही आज ना उद्या नाहीसे व्हाल.

सरतेशेवटी, मी तुम्हाला एवढेच सांगू शकतो की हा अहंकारी स्वभाव आपले जीवन अतिशय दु:खी करून टाकेल. कारण स्वत:कडे आणि सर्व जगाकडे पाहण्याची आपली चुकीची पद्धत. तुम्ही जर चांगले पाहिलेत तर तुम्ही आनंदी, सुखी राहाल. योग्य तऱ्हेने पाहणे हे जसे तुम्हाला सुखी करते, तसेच चुकीच्या दृष्टीने पाहणे तुम्हाला दु:खी करते. म्हणून अहंकार हा वाईट पाहण्याकडून असमाधानाकडे नेतो.

अहंकारी माणसाला कुठलाही विश्वास असूच शकत नाही. तो अविश्वासातच जगतो. कारण या सगळ्याचा

तो एक भाग आहे असं त्याला वाटू शकत नाही. त्याच्या अविश्वासाने तो एक साधा भाग असतो. कारण तो स्वत:ला वेगळा समजतो. तो एक स्वतंत्र, इतरांपासून वेगळा असतो असे वाटते. ही अहंकाराची खूण आहे. अविश्वास हा अहंकारी माणसाचा श्वास असतो.

अहंकारी माणसाच्या खूप अपेक्षा आणि मागण्या असतात, ज्या कधीही संपणार नाहीत. त्याच्या ह्या अपेक्षा कधी पुऱ्या होणाऱ्या नसतात. अशक्य! मागण्या फार मोठमोठ्या असतात, अमर्याद असतात. अशा वेळी तुमचं समाधान कसं होणार? हा अहंकाराचा एक स्वभावच असतो.

हा अहंकार फार संसर्गजन्य असतो. जर मी एखाद्या अहंकारी माणसाला इतका कडक, आत्मकेंद्रित आणि दुसऱ्याशी तुसडेपणाने वागताना पाहिला, तर तला वाटतं, ओहो! हाच का तो दर्जा? असं मी म्हणू शकतो. मी त्याच्यासारखा का होऊ शकत नाही? अशा प्रकारे अहंकार असा संसर्गाने होणारा असतो. मला तरी असंच वाटतं.

आणि मी म्हटल्याप्रमाणे हा अहंकार प्रत्येकात असतोच. अगदी कैदी, गुन्हेगार ह्यांच्यातही अहंभाव असतोच. कारण एकाचा गुन्हा दुसऱ्याने केलेल्या गुन्ह्यापेक्षा मोठा असतो आणि अहंकार हा भुतासारखाच आहे, जो तुमची शिकार करून, जन्मभर तुमचा पाठलाग करतो.

हा अहंकार तुमच्या देहाची एक ओळखच बनून जातो, तुमच्या कृतीवरून, तुमच्या हुशारीवरून हे समजते आणि तुमची स्वत:ची खरी ओळख जराही जाणवत नाही. म्हणून असं म्हणता येईल की या सर्व गोष्टींमधून– तुमचे विचार, तुमची देहबोली, तुमची हुशारी, तुमचा हुद्दा यावरून तुम्ही अहंकारी असल्याचे समजते. अहंकारी माणसाची अशी जडणघडण असते आणि ह्या अहंकाराचे परिणाम आपल्या नित्य जीवनावर होतात.

आता आपण काही वेळापुरता निरहंकारी व्यक्तीचा अभ्यास करूया. तो निरहंकारी आहे हे कसं काय? त्याच्यात अहंकाराचा जराही मागोवा नाही. का बरं? कारण त्याला माहीत असतं की तो स्वत: कर्ता नाही. त्याच्या मागे मार्गदर्शक म्हणून परमेश्वर आहे. त्याच्या वरही परमेश्वर आहे. हा फक्त त्याच्या हातातील साधन आहे. असा माणूसच जीवनातील सौंदर्य, जीवनातील रस उपभोगू शकतो कारण त्याचा देवावर विश्वास असतो. तो श्रद्धावान आणि अस्तिक असतो. त्याला माहीत असतं की फक्त देवच आहे, आणि मी तो नाही. हे भगवान! मी नाही तर तूच एकमेव आहेस. अशी निरहंकारी माणसाची भावना असते आणि तो देवत्वाच्या निकट असतो.

माझा हा शब्द आहे की खरं म्हणजे असा निरहंकारी माणूस कधीच दु:खी होणार नाही. तो सदैव सुखीच राहील. का? कारण तो समाधानी वृत्तीने राहतो. त्याला माहीत असतं की देव जे ठरवेल तसंच जीवनात होईल. त्यामुळे त्याच्या मनाची स्वीकाराची ताकद वाढत जाते. तो स्वत:ला समुद्रातील एक छोटासा जलकण समजतो, हेच ते कारण! तो स्वत:ला एक वाळूचा कण समजतो. तो स्वत:ला फार उच्च समजत नाही. म्हणून आपल्याला समजलं पाहिजे की अशा प्रकारचा निरहंकारीपणा, अशा तऱ्हेची जागृती आपल्याला देवत्वाच्या अगदी जवळ आणेल. अशा तऱ्हेने आपण जीवनात अमर होऊ. अहंकार नसलेली व्यक्ती अमर होते यात शंकाच नाही. तो कधीही, काहीही गमावणार नाही. तुम्ही त्याला केव्हाही पराभूत करू शकणार नाही. तो केव्हाही हरणार नाही. अशक्य आहे! का? तर त्याने निर्णय देवाच्या हातात सोपवलेला असतो. जय–पराजय ठरवणारा तो परमेश्वर आहे. मी कोणीही नाही. मी जबाबदार नाही. तर अशा माणसाला तुम्ही कसे काय हरवणार? अशक्य! आणि असा अहंकारविरहित माणूस दुसऱ्याबरोबर सहकार्याने काम करतो. तो अगदी साधा, निर्व्याज आणि नम्र असतो.

म्हणून तुम्ही तुमच्यातील अहंकार सोडल्याशिवाय तुम्हाला तुमच्यामधील देवत्व कधीच सापडणार नाही, लक्षात येणार नाही आणि अनुभवता येणार नाही आणि मग निरहंकारी माणसाचा देवावरचा विश्वास अढळ होत जाईल. आणि त्याला अनुभव येईल की तो देवदूत स्वतंत्र कोणी नाही, तो स्वत: त्या अस्तित्वाचाच भाग होऊन

राहील. तो दुसऱ्यापेक्षा वेगळा नसून एकच आहे. तो अद्वितीय असा नसून जो आहे तसाच आहे!

म्हणून निरहंकारी माणूस त्याचं जीवन अत्यंत आनंदात घालवतो आणि अहंकार विरहित माणूस जो देवत्वाच्या अगदी निकट असतो, तो त्याच्यातील शाश्वत तत्व अनुभवतो. मी केवळ साक्षी आहे, जे जे काही घडत असते त्याचा मी भाग नसतो. हे सगळं जीवन म्हणजे नाटक आहे. परमेश्वर हा दिशा दाखवणारा दिग्दर्शक आहे. तोच इथे सूत्रधारी दिग्दर्शक आहे, आणि मी फक्त पात्रधारी आहे, एक नट आहे. म्हणून अहंकार नसणारा माणूस नेहमी आनंदी असतो. सुखी असतो कारण जीवनाकडे पाहण्याची त्याची दृष्टी विशाल असते.

खरं तर आपल्याला एका गोष्टीबद्दल प्रश्न पडला पाहिजे की आपल्याला आपल्या जन्माबद्दल जागृती आहे का? नाही. आपल्याला आपल्या मृत्यूच्या तारखेची तरी खात्री आहे का? नाही. म्हणूनच हा अहंकार जीवन-मरणाच्या काळात वाढत जातो. आपण मुळातच अहंकारी का असावं? हे फारच हास्यास्पद आहे.

म्हणून निरहंकारी व्यक्ती त्याच्याकडे जे असते त्यातच नेहमी सुखी असतो. त्याच्या काही अपेक्षा नसतात, मागण्या नसतात. कारण त्याला माहीत असतं की परमेश्वर त्याच्या योग्यतेप्रमाणे त्याला जे जरूर असतं ते देतो. त्यामुळे त्याच्याकडे उच्च प्रतीची कृतज्ञता आणि आभार मानण्याची वृत्ती असते.

म्हणून अहंकार नसलेला माणूस नेहमी हसतमुख, हसरा, गाणे गुणगुणणारा आणि आनंदाने नाचणारा दिसतो. तो आनंदात असणारा, चांदण्यात फिरणारा, बागेत हिंडणारा, चंद्रप्रकाशाला न्याहाळणारा असा असतो. तो खूप सुखी असतो कारण अहंकार नसलेला माणूस तशाच जाणीवांशीच जोडलेला असतो. तो ज्ञानीयांना जाणतो. ते हे काय चाललं आहे हे जाणण्याच्या मार्गावर असतो.

म्हणून आपण समजून घेतलं पाहिजे की अहंकारी असणं हा भौतिक जगात जगणाऱ्या माणसाचा स्थायीभाव आहे. निरहंकारी असणं ही अध्यात्मिक माणसाची प्रकृती आहे. जीवनामध्ये अहंकारविरहित होण्यासाठी खूप प्रयत्न करू या, श्रम घेऊ या आणि प्रार्थना करूया.

साईराम.